आरएनटीसीपी जनजागृती उपक्रम कृती नियोजन -सन २०१७-१८ अंतर्गत प्रसिध्दी व जनजागृती उपक्रमास प्रशासकीय मान्यता देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
सार्वजनिक आरोग्य विभाग
शासन निर्णय, क्रमांकः आयईसी २०१८/प्र.क्र. ४८ /आरोग्य ३

१० वा मजला, संकुल इमारत,
जी.टी. रुग्णालय आवार, मुंबई - ४०० ००१.
दिनांक : २१ मार्च, २०१८.

वाचा :

१) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक - मावज २०१६/प्र.क्र.३९७/३४, दि.०५.०१.२०१७

२) आरोग्य सेवा संचालनालय,मुंबई यांचे पत्र क्रमांक- संआसे/३८९०-३८९२/खरेदी कक्ष /टे-५/प्रशासकीय मंजुरी/२०१८,दिनांक १३.०३.२०१८.

शासन निर्णय:

आरएनटीपीसी जनजागृती उपक्रम कृती नियोजन -सन २०१७-१८ अंतर्गत खालील जनजागृती व प्रसिध्दी उपक्रमास आणि त्यासाठी आवश्यक अनुदान खर्च करण्यास याव्दारे प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे :-

अ.क्र.	उपक्रम	तपशिल	अपेक्षित खर्च (लाख/रुपये)
१	सहयाद्री दुरदर्शन वाहिनीवरुन क्षयरोगा विषयी संदेशाचा टि.व्ही.स्पॉट प्रसारण करणे	सुधारीत राष्ट्रीय क्षयरोग नियंत्रण कार्यक्रमाविषयी माहितीच्या संदेशाचा ६० सेकंदाचा टी.व्ही.स्पॉट मंजूर निधीमध्ये बसतील तेवढे दिवस प्रसारण करणे. याबाबत दूरदर्शन केंद्र वरळी,मुंबई यांना कार्यादेश देण्यात येतील.	५८.८७
२	राज्य परिवहन	राज्य परिवहन महामंडळाच्या प्रवासी निवडक	१०३.८१

	महामंडळाच्या प्रवासी एस.टी.बसेसमध्ये आसनाच्या पाठीमागे, हॅन्डलवर क्षयरोगा विषयी संदेश संदेश प्रदर्शित करुन प्रसिध्दी करणे	एस.टी.बसमध्ये आसनाच्या पाठीमागे ३०० मी.मी.x ६०० मी.मी. व ५०० मी.मी.x ६०० मी.मी.आकाराचे संदेश प्रदर्शीत करणे. (एका बसवर एक महिण्यासाठी संदेश प्रसिध्द करण्याचा खर्च प्रती बस ३८ आसनप्रमाणे) प्रदर्शन भाडे रु.५४००/- + प्रिंटींग चार्जेस- २८५०/- (प्रती सीट रु.७५/-) +संदेश फिक्सींग चार्जेस रु.७६००(प्रती सीट रु.२००/) --- एकूण रु. १५८५०/- +१८% जीएसटी = २८५३ ------------------------------------- एकूण सर्व रु. १८७०३/- याप्रमाणे र्व खर्चासहित यासाठी मंजूर निधीमध्ये बसतील तेवढया एस.टी. बसेसवर संदेश प्रदर्शित करणे. सदर काम एसटी बसेसमध्ये सीटच्या मागे संदेश प्रदर्शीत करण्यासाठी नियुक्त मे.ओम ॲडव्हर्टायझींग या sole right संस्थेकडून त्याचेकडील दरानुसार करुन घेण्यात येईल	
३	आरएनटीसीपी विषयी संदेशाची पोस्टर्स तयार करुन जिल्हयांना पुरवठा करणे.	आकार - १८ इंच x २३ इंच कागद - ११० जीएसएम सचित्र रंगीत छपाई, पाठीमागील बाजुस वर व खाली गमींग अथवा अडकविण्याची सुविधा, पुढील बाजूने लॅमिनेशन केलेले पोस्टर्स तयार करणे. सदर काम शासकीय फोटोझिंको मुद्रणालय,पुणे यांचेकडून मंजूर निधीमध्ये बसतील तेवढे पोस्टर्स तयार करुन जिल्हयांना वाटप करण्यात येईल.	**२०.००**
४	आरोग्य कर्मचा-यांसाठी	अकार - ए ४	१२.५०

	क्षयरोगाविषयी माहितीचे पिलपबुक छपाई करुन जिल्हयांना पुरवठा करणे .	पानांची संख्या - ३२ आतील कागद - २१० जीएसएम आर्ट पेपर, मुख्यपृष्ठ - ३०० जीएसएम छपाईचे स्वरुप - ४ रंगात, सचित्र, ऑफसेट, स्पायरल बाईंडींग, व पाठोपाठ छपाई, सदर काम सर्व खर्चासहित मंजूर निधीमध्ये बसतील तेवढे पिलपबुक ई - निविदा प्रक्रियेव्दारे करण्यात येईल.	
५	क्षयरोगाविषयी संदेशाची डिजीटल पीव्हीसी बॅनर्स छपाई करुन जिल्हयांना पुरवठा करणे .	**आकार** - ५ फूट x ३ फूट = १५ स्क्वे.फुट पीव्हीसी मटेरीयल **छपाई**- सचित्र, अडकवण्या -साठी आयलेट सुविधा. **एकूण संख्या**- सर्व खर्चासहित मंजूर निधीमध्ये बसतील तेवढे बॅनर्स (४०८८२) (प्रति स्क्वे.फुट दर रु.७.१०/- (लावणे व काढणे वगळून) प्रमाणे १५ स्क्वे.फुट आकाराच्या एका बॅनरसाठी रु.१०६.५०/- इतका खर्च (जीएसटी व सर्व खर्चासहित) शासन निर्णय, सा.प्र.वि. दि.१४.०७.२०१६ नुसार बॅनर्स छपाई करुन पुरवठा करण्यासाठी मे.कल्याणी कार्पोरेशन पुणे ही संस्था नियुक्त करण्यात आली आहे. सदर संस्थेच्या दरानुसार मंजूर निधीमध्ये बसतील तेवढे बॅनर्स तयार करून जिल्हयांना पुरवठा करण्यात येईल.	४३.५४
६	मुंबई व राज्यातील इतर मनपा कार्यक्षेत्रातील कार्पोरेशनच्या व एसटी महामंडळाच्या बसेसवर क्षयरोगाविषयी संदेश प्रदर्शित करुन प्रसिध्द करणे	निधी व दरानुसार निवडक एस.टी./बेस्ट बसेसच्या दरवाजाच्या उजव्या बाजूचे साईड पॅनलवर २२ x २ फूट आकाराचा संदेश एक महिना अथवा बसतील तेवढे दिवस प्रदर्शित करुन प्रसिध्द करणे. अ)सदर काम खाली नमूद केल्यानुसार संबंधीत म.न.पा.कार्यक्षेत्रासाठी बसेसवर संदेश प्रदर्शीत करण्यासाठी असलेल्या Sole rights संस्थेमार्फत करुन घेता येईल.	७७.९८

		१)मनपा, ठाणे - मे.ॲक्सेल ॲड.ठाणे (वेस्ट), २)सोलापूर - प्रो- ॲक्टीव्ह इन अँड आऊट ॲड.विलेपार्ले, मुंबई, ३)पुणे- पायोयिर पब्लीसीटी कार्पो.प्रा.लि.पुणे ४)कोल्हापूर - मे. आऊटदेअर, कोल्हापूर ५)कल्याण - मे.सन एन ॲड टार ॲड.प्रा.लि. पुणे आ) उर्वरीत मनपा कार्यक्षेत्रामध्ये महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या निवडक एसटी बसेसवर महामंडळाने एकाधिकृत केलेल्या मे.राकेश ॲडव्हर्टायझर्स, मुंबई या संस्थेमार्फत काम करून घेण्यात येईल. तसेच मुंबई महानगरपालिका कार्यक्षेत्रातील निवडक बेस्ट बसेसवर sole rights दिलेल्या मे.राकेश ॲडव्हर्टायझर्स, मुंबई या संस्थेमार्फत मंजूर निधीच्या अधीन राहून करून घेण्यात येईल.	
			३१६.७०

२. वर नमूद उपक्रमांसाठीचा खर्च सन २०१७-१८ च्या पीआयपी मध्ये मंजूर केलेल्या आरएनटीसीपी कार्यक्रमांतर्गत (B.१०.७.४.१४) साठी रु.४१३.४८ लाख इतक्या मंजूर असलेल्या निधीमधून भागविण्यात यावा.

३. शासकीय जाहिरात वितरण धोरणासंदर्भात संदर्भ क्रमांक २ येथील शासन निर्णयातील आदेशानुसार सदर उपक्रमास महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मुंबई यांची मान्यता घेण्यात यावी.

४. सदर शासननिर्णय, शासन निर्णय,वित्त विभाग क्र.विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/२०१३/विनियम भाग-२,दि.१७.४.२०१५ सोबतच्या परिशिष्टातील वित्तीय अधिकार

नियम पुस्तिका,१९७८,भाग पहिला,उपविभाग-दोन मधील अ.क्र.४,नियम क्र.७ अन्वये प्रशासकीय विभागास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानुसार निर्गमीत करण्यात येत आहे.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०३१९१८००४२७९१७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Rajendra Shamraoji Kaurte

Digitally signed by Rajendra Shamraoji Kaurte
DN: CN = Rajendra Shamraoji Kaurte, C = IN, S = Maharashtra, O = Government Of Maharashtra, OU = Public Health Department
Date: 2018.03.21 19:46:12 +05'30'

(रा.शा.कौरते)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रत,

१. महालेखापाल- १ / २, महाराष्ट्र, (लेखा परिक्षा) (लेखा व अनुज्ञेयता), मुंबई/ नागपूर.
२. आयुक्त, आरोग्य सेवा तथा संचालक, राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान, मुंबई.
३. महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मुंबई.
४. संचालक, आरोग्य सेवा, मुंबई.
५. सहसंचालक, (अर्थ व प्रशासन)आरोग्य सेवा, मुंबई.
६. उप संचालक, आरोग्य सेवा, राज्य आरोग्य शिक्षण व संपर्क विभाग, पुणे.
७. जिल्हा कोषागार अधिकारी, पुणे.
८. वित्त विभाग (कोषागारे/ प्रशासन ५), मंत्रालय, मुंबई.
९. कक्ष अधिकारी, सार्वजनिक आरोग्य विभाग (अर्थसंकल्प), मंत्रालय, मुंबई.
१०.निवडनस्ती (कार्यासन आरोग्य-३).